The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# संत साहित्यामध्ये अभिव्यक्त विद्रोह

**श्री.संतोष मारुती लोंढे,**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग ,
सांगोला महाविद्यालय,सांगोला ता.सांगोला, जि.सोलापूर

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राच्या अध्यात्मिक संस्कृतीच्या विशाल व विस्तीर्ण इतिहासातील एक महत्त्वाचा व मानवी आयुष्याला सकारात्मक दिशा देणारा घटक म्हणजे 'संत साहित्य होय. वस्तुत: अध्यात्म, धर्म आणि संत या संकल्पनांचा विलगाने परामर्श घेतला, तर प्रत्येक संकल्पना ही अंतस्थ: आणि सामाजिक जीवनाशी एकरूप अथवा जुड्ल्याचे दिसून येते. धार्मिकतेकडून अध्यात्माकडे जाताना मानवतावादी विचारांचा पुरस्कार करून परिवर्तन करू पाहणाऱ्या ईश्वरीय आणि संसारी असूनही असार वृत्तीच्या लोकांनी स्वतःचा वेगळा पंथ निर्माण केला. तो जपला आणि प्रसारही केला. या पंथालाच 'वारकरी पंथ' असेही संबोधले जाते. या पंथाचे निर्माते आणि प्रचारक म्हणून संताचे स्थान अढळ आहे. संत परंपरेच्या अधिष्ठानावरच महाराष्ट्राच्या अध्यात्मिक पार्श्वभूमीचा विचार होणे क्रमप्राप्त आहे. त्याचबरोबर संतांच्या प्रबोधनात्मक विचारसरणीच्या सहाय्याने संत साहित्याचा समग्रपणे विचार होतो. संतांनी महाराष्ट्रातील जनतेला प्रबोधन करताना तत्कालीन प्रचलित अनेक परंपरांच्या व रुढीच्या विरोधात मार्गदर्शन केले आहे. या अनुषंगाने संत साहित्यातील सामाजिक,सांस्कृतिक,राजकीय व इतर क्षेत्रातील समाजहितकारक विचारांचा व त्यातून अभिव्यक्त विद्रोहाचा विचार या शोधनिबंधामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

**महाराष्ट्राची आध्यात्मिक पार्श्वभूमी :**

महाराष्ट्र हे भारतातील एक पुरोगामीत्वाचा व सांस्कृतिक वारसा असलेले राज्य आहे.या महाराष्ट्रामध्ये हिंदू,मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख इत्यादी धर्मियांच्या संस्कृतीच्या संमिश्र भावनेतून या राज्याची वाटचाल झाली आहे. धर्म,वंश, भाषा, प्रदेश यामध्ये विभागलेल्या लोकांची मने 'अध्यात्म' या एका भावनेच्या आधाराने एकसंध बनली असल्याचे सत्य पूर्व इतिहास सांगतो. याच पूर्व इतिहासातून महाराष्ट्राची आध्यात्मिक पार्श्वभूमी घडत गेली. रगेल आणि रंगेल महाराष्ट्रातील जनतेच्या जागृतीसाठी 'संत साहित्य' आणि पर्यायाने 'संत' महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात. परमेश्वरावर विसंबलेला माणूस परमेश्वर आपल्याला सर्व समस्यातून सहजी निभावून नेईल. या अपेक्षेने आयुष्य जगू पाहणाऱ्या लोकांच्या वैयक्तिक तत्त्वज्ञानाचा विचार हा आलस्याचा एक भाग होता. या कालखंडामध्ये संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत गोरा कुंभार, निवृत्तीनाथ, मुक्ताबाई या संत मंडळींनी तत्कालीन समाजाला दिशादर्शक प्रबोधन केल्याचे दिसते. आपल्या समस्यांचे निराकरण ईश्वर स्वीकृतीने होऊ शकते. असा विश्वास बाळगून कष्ट, आत्मनिर्भरता

यापासून दूर पळणारे लोक होते. १३ व्या शतकामध्ये संतांनी 'बुडती हे जन न देखवी डोळा' या भूमिकेतून तत्कालीन जनतेचे प्रबोधन केले. चांगल्याचा पुरस्कार करून वाईटाचा धिक्कार केला. साधारणपणे ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या पूर्वीची भक्ती आणि रचना ही मर्यादित, तर संस्कृत किंवा संस्कृतप्रचुर भाषेवर आधारित होती. संतापुर्वीचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक काळ म्हणजे पूजा-अर्चा, त्रैवर्णिकाना मानाचे स्थान असलेला, व्रतवैकल्ये, नवस-सायास, तीर्थयात्रा, श्राद्धविधी, दानधर्म यामध्ये अडकून पडलेल्या लोकांचा काळ होता. असे असले तरी तत्कालीन लोक शिल्पकला, संगीत, ग्रंथनिर्मिती यामध्ये प्रवीण असल्याचेही दिसून येते.

**संतांचे सामाजिक योगदान:**

'जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।

संत तुकारामांच्या या अभंगातून संतांचे कार्य दर्शित करताना, संत म्हणजे केवळ देव-देव करून सामान्य लोकांच्या भक्तीभावाचे भांडवल करून स्वतःच्या संतपणाचे अवडंबर माजविणे नाही. तर आपल्या कृतीतून आपल्या संतत्वाची ओळख करून देणारा खरा संत असतो. 'ज्ञानदेवे रचियेला पाया । तुका झालासे कळस।' या संत नामदेवांच्या रचनेनुसार ज्ञानेश्वरांनी पाया घातलेल्या आणि संत तुकाराम कळस झालेल्या या भागवत धर्माच्या इमारतीने महाराष्ट्राला 'संतांची भूमी' ही बिरुदावली बहाल केली. जातीयतेला गाडून भक्ती हाच मार्ग मानलेल्या नामदेव शिंपी, गोरा कुंभार, चोखामेळा, बंका महार, सेना न्हावी, कान्होपात्रा, सखुबाई, भागुबाई, रोहिदास, सावता माळी, नरहरी सोनार इत्यादी संतांनी जाती-धर्माच्या पलीकडचे जग दाखवण्याचे काम केले. केवळ जातीच्याच नाही तर धर्माच्या पलीकडेही केवळ परमेश्वर आणि भक्तीच श्रेष्ठ असल्याचे शेख महंमद, शाह मुंतोजी, मेहेरबाबा, सालबेग इत्यादी मुस्लिम संतांनीही दाखवून दिले आहे. स्त्री, शूद्र, जात, धर्म, पंथ, वर्ण, विद्या याच्या अभिमानाला भक्ती सांप्रदायात शश्व स्थान देणाऱ्या वारकरी संपदायातील संतांचे सामाजिक योगदान मोठे असल्याचे दिसून येते.एकूणच सामाजिक जीवनाला अवकळा आणणाऱ्या सामाजिक परिस्थितीमध्ये मध्ययुगीन कालखंडामध्ये संतांनी केलेले कार्य हे समाजहीताचेच होते.

:

मूलतः विद्रोह म्हणजे नकार. ही ढोबळ संकल्पना गृहीत धरली तर मराठी साहित्यातील विविधांगी वाङ्मय धारेमधील विद्रोहाचे स्वरूप आणि संत साहित्यातील विद्रोहाचे स्वरूप यामध्ये निश्चितपणे तफावत आढळते. 'माणसांचा कोंडमारा करणाऱ्या संस्कृतीला आणि देवत्वाला नकार देणाऱ्या दलित साहित्यातील विद्रोह आणि ईश्वरीय अस्तित्व मान्य करूनही पाषाणी मूर्तीची पूजा करणाऱ्या लोकांच्या दांभिकतेला विरोध करणारा 'विद्रोह'. या दोन्ही भूमिका विसंगत वाटू लागतात. परंतु अनिष्ठाला आणि दांभिकतेला विरोध करण्याची वृत्ती आणि आत्मसन्मानासाठी, माणसांच्या माणूसपणासाठी ईश्वरी शक्तीला व मानवी प्रवृत्तीला विरोध करणारी वृत्तीया कर्मसाध्याचा विचार केल्यास 'नकार' हे समान सूत्र दिसून येते. या नकाराचे प्रत्येक कालखंडामध्ये स्वरूप बदलतानाही दिसते. संत साहित्य हे मुळातच भक्ती, नामस्मरण, ईश्वरप्राप्ती, पाप-पुण्य या मोजपट्टीतून मोजले

जाते. त्यामुळे उपरोक्त घटकांच्या प्राप्तीसाठी धडपडणाऱ्या सर्व लोकांच्या मनात संत साहित्य म्हटलं की, 'विठ्ठल महात्म्य, नाम महात्म्य,पंढरपूर महात्म्य व्यक्त करणारे साहित्य. अशी व्याख्या निर्माण होते. मात्र संत मंडळीतील संत तुकाराम, चोखामेळा, संत एकनाथ अशा अनेक संतांनी परमेश्वराच्या भक्ती व नाममार्गाचा पुरस्कार करतानाच स्वतःची स्वतंत्र, तर्कशुद्ध आणि विवेक बुद्धीने आपली भूमिका मांडली. तत्कालीन समाजाच्या खोट्या आचरणावर कोरडे ओढले. त्या अनुषंगाने संतांची वचने म्हणजे त्या त्या काळातील प्रचलित चालीरीती, रूढी-परंपरा आणि पर्यायाने त्या रूढीचे संरक्षण आणि संक्रमण करणाऱ्या जनसामान्यांच्या व कर्मठांच्या विरोधातील विद्रोहच मानावा लागेल. तर तुलनेने विचार करता संत तुकारामांचे अभंग आणि कबीराचे दोहे मध्ये साम्यत्व जाणवते.

केवळ प्रचलित बाबींना विरोध करून आपला नकार आणि विद्रोह् अनेक संतांनी अभंग,ओव्या, दोहे यातून अभिव्यक्त केल्याचे दिसते. दगडी मूर्तीत देव नाही आणि जर असे मारून कुणी दगडी मुर्तीची पूजा करीत असेल तर तो पूजकही दगडच मानायला हवा. असे सांगताना कबीर म्हणतात.

पांहगां केरा धुतला, करि पुजै करतार,
इही भरोसे दे रहे, ते बुडे कालीधार.

दगडी मूर्ती आपली तारणहार नाही. हे जसे सत्य आहे तसे भविष्य सांगणारा हा सुद्धा पाखंडी आहे. त्याचे तोंडही पाहू नका. उपवास करणे, नवस करणे, यज्ञात खाद्यपदार्थांची नासाडी करणे, अंगात येणे, कौल लावणे या गोष्टी अनिष्ट आहेत. याविरोधात आपली भूमिका मांडताना संत तुकाराम म्हणतात.

नवसे कन्यापुत्र होती तरी का करणे लागे पती

संत तुकारामांच्या अभंगाप्रमाणेच संत नामदेव यांनी देवाचा प्रसार करणारे लोक आपल्याशी देव बोलत असतो. असे सांगत असेल तर सांगणारे आणि ऐकणारे दोघे मूर्खच मानायला हवेत. हे सांगताना संत नामदेव म्हणतात,

प्रस्तराचा देव बोलत भक्ताशी । सांगते ऐकते मूर्ख दोन्ही।

तर

नवल दंभाचे कौतुक । अग्निहोत्री म्हणती यांत्रिक ।
मंत्रातंत्राची कथा कोण । मुख्य गायत्री विकिती ब्राम्हण ।।

या शब्दात संत एकनाथ दांभिक लोकांचा समाचार घेतात.

संत तुकारामांनी तर तिला लावून,भगवी कफनी घालून फिरणाऱ्या लोकांवर कठोर शब्दात आपला राग व्यक्त केला आहे.ते म्हणतात,

टिळा टोपी उंच दावी । जागी मी एक गोसावी ।
अवघा वरपंग सारा । पोटी विषयांचा थारा ।।

समाजामध्ये सामान्यांना फसविणाऱ्या लोकांची कमतरता नाही. त्या फसव्या आणि ढोंगी साधूंच्या फसवेपणाचा समाचार घेतल्याचे दिसते.

वास्तविक पाहता प्रत्येक संतानी परिस्थितीतील अशा कर्मकांडी व ढोंगी लोकांवर प्रहार केला आहे. एका अर्थाने तो प्राप्त परिस्थितीत शाब्दिक विरोधच होता. विद्रोहाच होता. या विद्रोहाचे स्वरूप प्रबोधनात्मक होते. कृतीशीर होते. सामूहिक व संघटनात्मक पातळीवर त्यांच्या विद्रोहाची सिद्धता होत नसली, तरी त्यांच्या कृतीशील प्रबोधनाचे स्वरूप त्यांच्या साहित्यातून जाणवते. यात शंका नाही.कर्मठांच्या कर्मठपणाचे बळी ठरलेले संत ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे, त्यांचा विद्रोह सौम्य शब्दात का होईना व्यक्त करताना दिसतात. हीच विद्रोही अवस्था इतर संतांची जाणवते. ती प्रसंगपरत्वे वेगळी आणि शब्दातील मृदुपणे अथवा कठोरतेने. इतकाच फरक आहे.

**समारोप** :

वस्तूत: विद्रोह म्हणजे बंड. असा जरी विद्रोहाचा लौकिकार्थ असला तरी, प्रस्थापित,सुस्थापित आणि वैचारिक अधिष्टानातून क्रांतीचे बळ असणारी शक्तिमान आणि व्यापक अशी भावना म्हणजे विद्रोह मानावे लागते. या पार्श्वभूमीवर विचार केल्यास विद्रोही भूमिका ही मुख्यत्वेकरून दलित साहित्यामध्ये आढळते. परंतु विद्रोहाची खोली पाहता अनिष्ट अथवा मानव जमातीला मारक अशा गोष्टीला केलेला सकारात्मक विरोध म्हणजे सुद्धा विद्रोहच मानावा लागतो. त्यामुळेच स्त्री-पुरुष लेखक, दलित लेखक, शाहीर, पंडित व संत या सर्वांनी किमान स्वरूपात का होईना परंतु आपल्या लेखनामध्ये व्यवस्थेवरील स्वतःचा राग व्यक्त केला आहे. त्या रागातूनच समाज परिवर्तन करण्याचा प्रयत्न करताना तत्कालीन प्रचलित व समाजकंटकी लोकांच्या बेगडी चारीतीवर रुढी विरोधात आपली लेखणी चालवली. ओव्या अभंग भारुडे अशा विविध माध्यमातून तत्कालीन परिस्थिती व सामाजिक वास्तव संतानी सांगून त्याबाबतचा विरोध व्यक्त केल्याचे दिसते. भगवी कपडे घालून संतत्व प्राप्त होत नसते, त्यासाठी माणसात देव मानायला हवा. अशा स्वरूपाचे संतांच्या विद्रोहाचे प्रबोधनपर विद्रोही रूप त्यांच्या साहित्यातून जाणवते. हे नाकारता येत नाही.

**संदर्भ :**

**१)** चौघुले, वि.शं. - 'संत ,समाज आणि अध्यात्म' मधुरा प्रकाशन, ठाणे २००६

२) इनामदार, हे.वि. , खोले,विलास - 'भक्ती गंगेच्या वाटेवर' संजय प्रकाशन,पुणे १९८८

३) सरदार, गं.बा. - 'संत वाङ.मयाची फलश्रुती' म.सा.प.प्रकाशन पुणे,